# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** नागपूर महानगरपालिके अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन **{घनकचरा व्य. विभाग }** विभागाद्वारे शहरातील साफ-सफाई, चोकेज साफ सफाई, पावसाळी नाली साफ सफाई इत्यादि साफ सफाई वे काम हाताळण्यात येते. सदर कामाकरीता घनकचरा व्यवस्थापन विभागाचे स्थायी/अधिसंख्य / रोजंदारी (स्त्री/पुरूष) एकुण ७३१६ सफाई कर्मचारी कार्यरत आहे. सर्व सफाई कर्मचारी स्वच्छता विषयक कामे करीत असल्यामुळे त्यांना पाऊस सुरू असताना सुद्धा कामे करावी लागतात. पाऊस सुरू असताना स्वच्छता विषयक कामामध्ये अडथळा निर्माण होऊ नये, याकरीता सर्व सफाई कर्मचाऱ्यांना पावसाळ्यापूर्वी रेनकोट उपलब्ध करून देणे विचाराधीन आहे.

नागपूर महानगरपालिका, सामान्य प्रशासन विभाग याच्याद्वारे रेनकोट चा पुरवठा करण्यासंदर्भात दर करार करण्यात आलेले असुन सदर दरानुसार प्रती रेनकोट चा पुरवठा करण्याकरीता रू. १२५५/- मा. स्थायी समिती/ प्रशासक ठराव क्र. ६५ दिनांक २४/०८/२०२१ तसेच मनपा प्रशासक ठराव क्र. १०३५ दि. १४/०९/२०२४ मुदतवाढ अन्वये मंजुर करण्यात आलेले आहे. सदर मंजुर दरानुसार एकुण ७३१६ सफाई कर्मचाऱ्यांना (स्थायी, अधिसंख्य, रोजंदारी (स्त्री/पुरूष) करिता रेनकोट चा पुरवठा करण्याकरीता रू. ९१,८१,५८०/- खर्च अपेक्षित आहे.

सामान्य प्रशासन विभाग मनपाद्वारे निर्धारित दरानुसार घनकचरा व्यवस्थापन विभागाचे वरिल प्रमाणे सफाई कर्मचाऱ्यांना रेनकोट खरेदी करण्याकरीता माहे जून पेड ईन जुलै २०२५ च्या वेतनामध्ये समाविष्ट करून अदा करण्याबाबत प्रस्तावित आहे. सर्व सफाई कर्मचाऱ्यांना तीन वर्षातुन एकदा रेनकोट देण्याचे प्रस्तावित आहे.

करिता घनकचरा व्यवस्थापन विभागात कार्यरत सफाई कर्मचाऱ्यांना व नविन नियुक्त होणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांना तीन वर्षातुन एकदा रेनकोट खरेदी करण्याकरीता प्रस्तावित केल्याप्रमाणे रक्कम त्यांच्या वेतनात समाविष्ठ करुन कर्मचाऱ्यांना अदा करण्याच्या मान्यतेस्तव व सदरचा खर्च पदशिर्ष साफ-सफाई व घनकचरा व्यवस्थापन आस्थापना व्यय पद क्र. A24201210001 मधुन भागविण्याबाबतचा प्रश्न विचारात घेण्याकरीता सविनय सादर.

**टिप** :- सविस्तर माहिती नस्तीत उपलब्ध आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक** :- 109/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक** :- 09/06/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त, घनकचरा व्यवस्थापन विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिके अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन

विभागाद्वारे शहरातील साफ-सफाई, चोकेज साफ सफाई, पावसाळी नाली साफ सफाई इत्यादि साफ सफाई वे काम हाताळण्यात येते. सदर कामाकरीता घनकचरा व्यवस्थापन विभागाचे स्थायी/अधिसंख्य / रोजंदारी (स्त्री/पुरूष) एकुण ७३१६ सफाई कर्मचारी कार्यरत आहे. सर्व सफाई कर्मचारी स्वच्छता विषयक कामे करीत असल्यामुळे त्यांना पाऊस सुरू असताना सुद्धा कामे करावी लागतात. पाऊस सुरू असताना स्वच्छता विषयक कामामध्ये अडथळा निर्माण होऊ नये, याकरीता सर्व सफाई कर्मचाऱ्यांना पावसाळ्यापूर्वी रेनकोट उपलब्ध करून देणे विचाराधीन आहे.

नागपूर महानगरपालिका, सामान्य प्रशासन विभाग याच्याद्वारे रेनकोट चा पुरवठा करण्यासंदर्भात दर करार करण्यात आलेले असुन सदर दरानुसार प्रती रेनकोट चा पुरवठा करण्याकरीता रू. १२५५/- मा. स्थायी समिती/ प्रशासक ठराव क्र. ६५ दिनांक २४/०८/२०२१ तसेच मनपा प्रशासक ठराव क्र. १०३५ दि. १४/०९/२०२४ मुदतवाढ अन्वये मंजुर करण्यात आलेले आहे. सदर मंजुर दरानुसार एकुण ७३१६ सफाई कर्मचाऱ्यांना (स्थायी, अधिसंख्य, रोजंदारी (स्त्री/पुरूष) करिता रेनकोट चा पुरवठा करण्याकरीता रू. ९१,८१,५८०/- खर्च अपेक्षित आहे.

सामान्य प्रशासन विभाग मनपाद्वारे निर्धारित दरानुसार घनकचरा व्यवस्थापन विभागाचे वरिल प्रमाणे सफाई कर्मचाऱ्यांना रेनकोट खरेदी करण्याकरीता माहे जून पेड ईन जुलै २०२५ च्या वेतनामध्ये समाविष्ट करून अदा करण्याबाबत प्रस्तावित आहे. सर्व सफाई कर्मचाऱ्यांना तीन वर्षातुन एकदा रेनकोट देण्याचे प्रस्तावित आहे.

करिता घनकचरा व्यवस्थापन विभागात कार्यरत सफाई कर्मचाऱ्यांना व नविन नियुक्त होणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांना तीन वर्षातुन एकदा रेनकोट खरेदी करण्याकरीता प्रस्तावित केल्याप्रमाणे रक्कम त्यांच्या वेतनात समाविष्ठ करुन कर्मचाऱ्यांना अदा करण्याच्या मान्यतेस्तव व सदरचा खर्च पदशिर्ष साफ-सफाई व घनकचरा व्यवस्थापन आस्थापना व्यय पद क्र. A24201210001 मधुन भागविण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**डॉ. अभिजीत चौधरी (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**